# युगे अट्ठावीस

Yuge Atthavis — Pandurang Aarti · Sant Namdev

युगे अट्ठावीस विटेवरी उभा ।
वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा ।
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥१॥

> जय देव जय देव जय पांडुरंगा ।
> रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ॥ धृ ॥

तुळसीमाळा गळां कर ठेवुनी कटीं ।
कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटीं ॥
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनुमंत पुढें उभे राहती ॥२॥

धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळें वनमाळा गळां ॥
राही रखुमाई राणीया सकळा ।
ओवाळिती राजा विठोबा सावळा ॥३॥

ओवाळू आरत्या कुर्वंड्या येती ।
चंद्रभागेमाजी सोडुनियां देती ॥
दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥४॥

आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।

चंद्रभागेमध्यें स्नानें जे करिती ॥

दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती ।

केशवासी नामदेव भावें ओवाळिती ॥५ ॥